आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

८ जुलै २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- मुंबईत पावसामुळे जनजीवन विस्कळीत, गेल्या ५ वर्षातल्या जुलै महिन्यातला एका दिवसातला सर्वाधिक पाऊस / विधिमंडळाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- राज्यात विविध ठिकाणी जोरदार पाऊस / रायगड किल्ला पर्यटकांसाठी बंद
- पावसामुळे उद्भवलेल्या स्थितीचा सामना करण्यासाठी शासनानं विविध पावलं उचलली असल्याचं मुख्यमंत्र्यांच आढावा बैठकीनंतर प्रतिपादन

**आणि**

- नीट युजी पेपर फुटी प्रकरणी अहवाल सादर करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा संस्थेला आदेश

**<><><><><>**

मुंबई महानगर क्षेत्रात काल मध्यरात्रीपासून सुरू झालेल्या पावसानं सर्वत्र दाणादाण उडवली. सांताक्रुझ वेधशाळेत नोंद झालेला गेल्या ५ वर्षातल्या जुलै महिन्यातला एका दिवसातला हा सर्वाधिक पाऊस आहे. हवामान विभागाकडे झालेल्या नोंदीनुसार आज सकाळी साडे ८ पर्यंतच्या नोंदीनुसार गेल्या २४ तासात २६७ मिलिमीटर पाऊस झाला. यापूर्वी २ जुलै २०१९ रोजी ३७५ आणि १५ जुलै २००९ रोजी २७४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली होती. मुंबई महापालिकेच्या आकडेवारीनुसार मुंबईच्या पूर्व उपनगरात काही ठिकाणी मध्यरात्री १ ते सकाळी ७ दरम्यान सुमारे ३०० मिलीमीटर पाऊस झाला.

मध्य आणि हार्बर रेल्वे मार्गावर अनेक ठिकाणी पाणी साचल्यानं लोकल सेवा विस्कळीत झाली होती. सकाळी बराच वेळ मध्य रेल्वेवरच्या जलद लोकल बंद होत्या. कुर्ला ते पनवेल दरम्यान हार्बर मार्गावरची सेवाही दुपारपर्यंत बंद होती. पश्चिम रेल्वेची वाहतूक उशिरानं सुरू होती. यामुळं सर्व मार्गावरच्या अनेक लोकल

फेऱ्या रद्द झाल्या. सध्या लोकल सेवा उशिरानं सुरू आहेत. मुंबईतल्या रस्त्यांवर ठिकठिकाणी पाणी साचल्यानं बेस्टनं १७ ठिकाणांहून जाणाऱ्या बसच्या मार्गांमध्ये बदल केले आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी एसटी महामंडळानं पनवेल-दादर, पनवेल-वाशी मार्गावर बसची व्यवस्था केली होती. याशिवाय काही लांब पल्ल्याच्या गाड्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरुन सोडल्या.

रेल्वेनं नाशिक आणि पुण्याहून मुंबईकडे येणाऱ्या लघु पल्ल्याच्या गाड्या रद्द करण्यात आल्या होत्या. त्यामुळं अप-डाऊन करणाऱ्यांची गैरसोय झाली. लांब पल्ल्याच्या अनेक गाड्या मुंबईत उशिरा पोहोचल्या. त्यामुळं १५ गाड्या उशिरा सुटणार असल्याची घोषणा मध्य रेल्वेनं केली आहे.

मध्यरात्री पासूनच जोरदार पाऊस असल्यानं पालिकेनं मुंबईतल्या शाळांना सुटी जाहीर केली होती. राज्य सरकारनं कार्यालयं लवकर सोडण्याचे आदेश दुपारी जारी केले.

**<><><><><>**

विधिमंडळ अधिवेशनासाठी मुसळधार पावसामुळे आमदार वेळेत पोहोचू न शकल्यानं विधानसभेचं कामकाज आज आधी दुपारी १ वाजेपर्यंत, तर विधानपरिषदेचं कामकाज बारा वाजेपर्यंत तहकूब करावं लागलं. त्यानंतर थोडं कामकाज झालं. मात्र दुपारनंतर भरतीमुळे पुन्हा पाणी साचण्याची शक्यता लक्षात घेउन मंत्रालयातल्या कर्मचाऱ्यांना लवकर सोडण्याच्या दृष्टीनं दोन्ही सभागृहांच कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

पावसामुळे राज्यातलं, विशेषतः मुंबईचं जनजीवन विस्कळीत होण्याला सरकार जबाबदार असल्याची टीका विधानसभेतले विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. तर, मुंबईतल्या यंदाच्या नालेसफाई प्रकरणी श्वेतपत्रिका काढावी अशी मागणी आशिष शेलार यांनी केली.

मुंबईतलं जनजीवन पावसामुळे विस्कळीत झाल्याच्या पार्श्वभूमीवर, सध्या परिस्थिती काय आहे आणि ती पूर्ववत करण्यासाठी काय पावलं सरकार उचलत आहे, याबाबतचं निवेदन सरकारनं करावं, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले. त्यावर, मुंबईत साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी अतिरिक्त पंप उपलब्ध करून दिले आहेत, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार निरंजन डावखरे आणि जगन्नाथ अभ्यंकर यांनी आज विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली.

**<><><><><>**

राज्यात आज विविध ठिकाणी जोरदार पाऊस झाला.

**कोल्हापूर** जिल्ह्यात पावसाचा जोर कायम आहे. शहरात आज दुपारी पावसानं विश्रान्ती घेतली होती मात्र संध्याकाळी पुन्हा पाऊस सुरू झाला. परिणामी पंचगंगा नदीचं पात्र फुगलं आहे. राजाराम बंधारा ३० फुटांवर असून नदीची इशारा पातळी ३९ आहे. जिल्ह्यातील ५७ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. राधानगरी धरण ४३ टक्के भरलं आहे. कोल्हापूर बाजारभोगाव राजापूर राज्यमार्ग बंद झाला आहे.

मुसळधार पावसामुळे ठाणे, वसई, महाड, चिपळूण, कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सिंधुदुर्ग इथं एनडीआरएफची पथकं तैनात करण्यात आली आहेत.

**रायगड** जिल्ह्यात जोरदार पाऊस होत असून नद्यांच्या पाण्यात वाढ झाली आहे. पावसाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. रायगड किल्ला परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाल्यामुळे आज पासून रायगड किल्ला पर्यटकांसाठी बंद करण्यात आला आहे.

**रत्नागिरी** आणि **सिंधुदुर्ग** जिल्ह्यातही संततधार पाऊस होत असून जनजीवनविस्कळीत झालं आहे. मुंबई गोवा महामार्गावरची वाहतूक कुडाळ नजीक पावशी इथं महामार्गावर पाणी आल्यामुळे १४ तास ठप्प असलेली वाहतूक आता सुरळीत झाली आहे.

अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर पावसानं काल **अकोला** जिल्ह्यात हजेरी लावली. त्यामुळे जिल्ह्यातल्या खोळंबलेल्या पेरण्या मार्गी लागणार असल्यानं शेतकरी आनंदात आहेत. मात्र, चांदूर - खडकी परिसरात काल अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी शेतात पाणी साचून भाजीपाला पाण्याखाली गेला. जिल्ह्यातल्या मोर्णा नदीच्या पाणी पातळीत देखील मोठी वाढ झाली आहे. दरम्यान, खासदार नारायण राणे यांनी आज पूरग्रस्त गावांना भेट दिली. आणि पूरग्रस्तांना सर्वतोपरी मदत करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या.

हवामान खात्यानं मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी केला आहे.

मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ आणि मुक्त अभ्यासक्रमाच्या आज होणाऱ्या सर्व परीक्षा रद्द केल्या असून या परीक्षा आता १३ जुलैला होणार आहेत.

**<><><><><>**

मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पावसामुळे उद्भवलेल्या स्थितीचा सामना करण्यासाठी शासनाने विविध पावलं उचलली आहेत असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत सांगितलं. मुंबईत निर्माण झालेल्या पूर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीनंतर ते पत्रकारपरिषदेत बोलत होते.

मुंबईत रेल्वे, महानगरपालिका आणि इतर यंत्रणा समन्वयाने परिस्थितीतून मार्ग काढत आहेत असं शिंदे यांनी सांगितलं. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेक ठिकाणी पावसामुळे पूरसदृश स्थिती उद्भवली असून तिथं राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथकं मदतीसाठी तैनात आहेत, असं ते म्हणाले.

किनारपट्टीच्या सर्व जिल्ह्यांमधे उद्यापर्यंत मुसळधार पावसाची शक्यता वेधशाळेनं व्यक्त केली असून त्यादृष्टीने आवश्यकता असेल तरच घरातून बाहेर पडावं आणि यंत्रणांना सहकार्य करावं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

**<><><><><>**

पेपर फुटीची व्याप्ती खूप मोठ्या प्रमाणावर असेल तरच फेरपरीक्षेचा विचार केला जाईल, असं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयानं आज नोंदवलं. नीट युजी पेपर फुटीच्या प्रकरणासंदर्भातला अहवाल न्यायालयात सादर करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार आणि राष्ट्रीय परीक्षा संस्थेला दिले आहेत. या प्रकरणाच्या तपासाच्या प्रगतीचा अहवाल सादर करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयानं सीबीआयला दिला आहे. हे दोन्ही अहवाल बुधवारी संध्याकाळपर्यंत सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

नीटची फेरपरीक्षा घ्यावी अशी मागणी करणाऱ्या याचिकेसह एकूण ३८ याचिकांवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. फेरपरीक्षा घेणं हा शेवटचा पर्याय असला पाहिजे, असंही न्यायालयानं म्हटलं आहे. या प्रकरणावरची पुढील सुनावणी येत्या गुरुवारी होणार आहे.

**<><><><><>**

मुंबईत मद्यपान करून वाहन चालवण्याची प्रकरणं थांबवण्यासाठी रस्ते, चौक, वर्दळीची ठिकाणी आणि नाक्यानाक्यांवर वाहनचालकांची तपासणी करून कडक कारवाई करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलीस आयुक्तांना

दिल्या आहेत. तसंच नियमांचं उल्लंघन करणारे पब्ज आणि बारवरही कारवाया कराव्यात, अशी सूचना मुंबई महापालिकेसह पोलीस प्रशासनाला देण्यात आली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी आणि सुट्टीच्या दिवशी तपासण्यांचं प्रमाण वाढवावं, मद्यपान करून वाहनं चालवणाऱ्या चालकांकडून दंड वसूल करण्यात यावा आणि वारंवार नियम मोडणाऱ्यांचा चालक परवाना रद्द करण्यात यावा, असंही शिंदे यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

संत ज्ञानेश्वर  महाराज यांची पालखी साताऱ्यातला अडीच दिवसांचा मुक्काम संपवून आज दुपारी तरडगावकडे मार्गस्थ झाली. वाटेत चांदोबाचा लिंब परिसरात पालखी सोहळ्यातलं उभं गोल रिंगण पार पडलं. लाखो वारकरी आणि परिसरातले भाविक यावेळी उपस्थित होते. रिंगण सोहळ्यानंतर पालखी तरडगाव मुक्कामी दाखल झाली.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी अतिवृष्टीचा अंदाज आहे. मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस होईल.

येत्या २४ तासांकरता सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा आणि पुणे जिल्ह्यांसाठी हवामानशास्त्र विभागाने रेड अलर्ट जारी केला असून मुंबईसह कोकणातले उर्वरित जिल्हे, तसंच कोल्हापूर, अकोला, अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यांकरता ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**//<><><><><>//**